# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - (०२२) २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Website:www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक :- २/एनजीसी/फार्मसी/मान्यता/२०१७/६५२
दिनांक:- 7 JUN 2017

प्रति,
प्राचार्य,
पंचाक्षरी शिवाचार्य ट्रस्टचे,
चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डिग्री),
बसवेश्वर चौक, कावा रोड,
लातूर

**डिटीई कोड - २२५३**

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्वावर संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या क्षमतेत वाढ करण्याबाबत.

संदर्भ :- १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. वेस्टर्न/१-३३२८०३५८१० /२०१७/ईओए, दि. ३० मार्च, २०१७.
२. शासन निर्णय क्र. टीईएम-२०१७/प्र.क्र.२१५/तांशि-४, दि.१५ मे, २०१७.

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना-अनुदान तत्वावर संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| १. | बी.फार्मसी | ६०-१०० |

सदर अटींपैकी आपण शासन निर्णयात नमूद केलेल्या अटी पालन करण्याचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तसेच आपल्या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदान तत्वावर संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास नियतठेव म्हणून रु ०१.५० खाते क्र. १३२३३०३१०१३६३१ दि. २६.०५.२०१७, अन्वये ओरियन्टल बँक ऑफ कॉमर्स, शाखा- मार्केट यार्ड, लातूर येथे संस्थेचे अध्यक्ष व संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात १० वर्षासाठी जमा केलेले आहेत. मूळ पावती पडताळणीसाठी या कार्यालयास सादर केली आहे.


CHANNABASWESHWAR
Degree Pharmacy College, Latur
Inward No. 2122
Date 20/06/17

संदर्भाकित शासन निर्णयात विहित केलेल्या अटी व शर्ती सह खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून कायम विना अनुदान तत्वावर वरीलप्रमाणे संस्थेमध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ करण्यास व संबंधीत विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाल्यानंतर विद्यार्थ्यांना विहीत पध्दतीने प्रवेश देण्यास या संचालनालयाकडून परवानगी देण्यात येत आहे.

१. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद / वास्तुकला परिषद / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया तसेच शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.
२. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमांक व पासवर्डव्दारे शुल्क प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवळी अद्ययावत करतील.
३. शासनाने, या संचालनालयाने, स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली / अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या अटी व शर्तीचे संस्था उल्लंघन करीत असल्यास सदरची संस्था बंद करण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली / वास्तुकला परिषद नवी दिल्ली / फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया यांच्या शिफारशीनुसार शासनास राहतील.

उपरोक्त तसेच संदर्भीन शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती आपणास बंधनकारक राहतील.

(चंद्रशेखर ओक, भा.प्र.से.)
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत- १. मा. अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. कुलसचिव, स्वामी रामानंद मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र. २ -अ , मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र. ३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.